# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

१२५८

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/कृतिका हौ/क.७७(अ)/ /२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. ठाणे
दिनांक :-१२/०७/२०१७

वाचले :- १) श्री.के.के.करलापीया व इतर ५ सभासद कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.यांचकडील दिनांक १७/६/२०१७ रोजीचा विषयांकीत अर्ज.
२) या कार्यालयाचे जा.क्र.उपनि/वसई/बी-१/तक्रार/कृतिका हौ/८३८/सन १७ दि. २१/०६/२०१७ चे पत्र.
३) या कार्यातील दिनांक ०३/७/२०१७ रोजीची सुनावणी.
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.न्यु दिवानमान,वसई रोड (प) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते,आणि,

ज्या अर्थी वाचले क्रमांक १ अन्वये संस्थेचे सभासद श्री.के.के.करलापीया व इतर ५ यांनी संस्थेच्या समितीवर निवडून आलेल्या एकूण १३ सभासदांपैकी श्रीम.भावना डी.ठकरार,श्री.उल्हास आर पाटील, श्रीम.शोभा बापेकर, श्री.बी.एस.मालीवया, श्री.जयराम राय के. यांनी त्यांचे संचालक पदांचे राजीनामे दिले असल्याचे तसेच या पूर्वी ज्या संचालकांनी त्यांच्या पदांचे राजीनामे दिले आहेत त्यांचे ऐवजी संस्थेने श्री.प्रकाश आर.लांडगे,श्री.बी.पी.आर.कंकानी, श्रीम.पुष्पा टेलर व श्री.देवेंद्र आय. राजपुत यांना बेकायदेशिर रित्या स्विकृत करुन घेतल्याचे नमूद करुन संस्थेची समिती सद्यस्थितीत अल्पमतात आली असल्याने सदरची समिती बरखास्त करुन संस्थेवर प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करावी अशी विनंती केली आहे. संदर्भ क्रमांक १ चे तक्रार अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील वाचले क्रमांक २ चे पत्राने याबाबत खुलासा सादर करणेबाबत या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणेबाबत संस्था समितीस कळविण्यांत आले आहे. दिनांक ०३/७/२०१७ रोजी संस्थेमार्फत संस्थेचे सचिव श्री.अब्राहम मॅथ्यू यांनी या कार्यालयात उपस्थित राहून संस्थेमार्फत लेखी म्हणने सादर केले आहे.आणि,

ज्या अर्थी या कार्यालयाकडील संदर्भ संस्थेचे सभासद श्री.के.के.करलापीया व इतर ५ यांनी संदर्भ क्रमांक १ चे तक्रार अर्जासोबत श्रीमती भावना ठकरार, श्री.भावेश मालविया, श्री.उल्हास रामदास पाटील, श्रीम.शोभा संतोष बापरकर, श्री.जयराम राय, श्री.प्रशांत टेलर, श्री.प्रविण अंबोळकर यांचे संचालक पदांचे राजीनामे सादर केलेले आहेत. सुनावणी दरम्यान श्री.अब्राहम यांनी श्री.कंकानी, श्री.लांडगे, श्रीम.पुष्पा टेलर व श्री.देवेंद्र राजपुत यांना संचालक मंडळावर स्विकृत केले असल्याचे व श्रीमती भावना ठकरार यांचा राजीनामा प्राप्त झाल्याचे तसेच संचालक श्री.एन.आर.मूर्ती यांनी त्यांची सदनिका बिकलेली आहे.असे निवेदन केले आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या समितीवर एकूण १३ सदस्य कार्यरत होते पैकी श्रीमती भावना ठकरार, श्री.भावेश मालविया, श्री.उल्हास रामदास पाटील, श्रीम.शोभा संतोष बापरकर, श्री.जयराम राय, श्री.प्रशांत टेलर, श्री.प्रविण अंबोळकर यांचे संचालक पदांचे राजीनामे सादर केले असल्याचे सिध्द होत आहे.तसेच श्री.एन.आर.मूर्ती यांनी त्यांची

Scanned by CamScanner

सदनिका विकलेली आहे संस्थेने बेकायदेशिररित्या श्री.कंकानी, श्री.लांडगे, श्रीम.पुष्पा टेलर व श्री.देवेंद्र राजपुत यांना संचालक मंडळावर स्विकृत केले आहे.सबब त्यामुळे संस्थेची समिती अप्लमतात आलेली आहे.आणि,

त्याअर्थी कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.न्यु दिवानमान,वसई रोड (प) ता.वसई जि.पालघर संस्थेवर सद्यस्थितीत संचालक मंडळ कार्यरत नसल्याबाबत माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, प्रियंका गाडीलकर, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.न्यु दिवानमान,वसई रोड (प) ता.वसई जि.पालघर या संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करुन त्याठिकाणी श्री. टि.एस.करकरे,सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,वसई -यांची प्राधिकृत अधिकारी मंडळ म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. १२/०७/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

( प्रियंका गाडीलकर )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रत,

१. श्री. टि.एस.करकरे,सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,वसई तथा प्राधिकृत अधिकारी , कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.न्यु दिवानमान,वसई रोड (प) ता.वसई जि.पालघर

२. सचिव, कृतिका को.ऑप.हौसिंग सोसा.लि.न्यु दिवानमान,वसई रोड (प) ता.वसई जि.पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा--वसई रोड.

Scanned by CamScanner